दि. २६/११/२०२२

# अहवाल

आज. दि. २६/११/२०२२ रोजी शरदचंद्र महाविद्यालयाच्या हॉल क्र. ०१ मध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. के. हरिभाऊ हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून सेवानिवृत्त प्राध्यापक गंगाधर हिंगोले हे होते. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, संविधान काटेकोरपणे राबवले नाही तर संविधान लोकशाही धोक्यात येईल असा गंभीर इशारा त्यांनी दिला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संविधानाच्या प्रास्ताविकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. श्याम पाटील, डॉ. शंकर गडुमवार, श्री. ग. मोरे, एम. जे. कदम यांच्यासह अनेक प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. [illegible] वाघमारे तर आभार प्रा. डॉ. शंकर गडुमवार यांनी मानले.

प्रा. डॉ. शंकर गडुमवार
सांस्कृतिक विभाग प्रमुख

# ा काटेकोरपणे राबविले नाही तर भ
# स्त्र हाती घेतील : प्रा.डॉ.हिंगोले उ



केलेल्या कार्यक्रमामध्ये प्रमूख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के. हरिबाबू हे होते तर उपप्राचार्य डॉ श्याम पाटील हे प्रमूख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.हिंगोले म्हणाले की, सध्या राजकारण्याकडून घटनाबाह्य कृती करीत आ-हेत. ज्यामध्ये धार्मिक कार्य, मंदिरे, मस्जिदे सरकारी पैश्यातून बांधल्या जात आहेत तर धर्माचा सर्रास वापर राजकारणासाठी केल्या जात आहे तसेच घटनानिर्मितीपासूनच आरएसएस चे प्रमूख गोळवलकर गुरुजी, केशव हेडगेवार, सुदर्शन, मोहन भागवत हे नेहमीच घटनाविरोधी वक्तव्य करीत असतात कारण त्यांना सर्वांसाठी असलेली समता, स्वातंत्र्य मान्य नाही.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस संविधानाच्या प्रास्ताविकेस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थी साईनाथ नामवाडे, प्रा. हणमंत हांडे, प्रा.डॉ. प्रकाश हिवराळे, प्रा.डॉ. शंकर गड्डमवार यांची समयोचित भाषणे झाली. नामवाडे यांनी सरकारप्रती भावना व्यक्त करताना म्हणाले की, ज्याप्रमाणे स्वातंत्र्यदिनी तिरंगा झेंडयाचे वाटप करण्यात